# प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शुगर ग्रीड लिमिटेड, मुक्काम पोस्ट – पिंगळी बुद्रुक, तालुका– माण, जिल्हा – सातारा, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन मळीवर आधारित १२०.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा इतिवृतांत

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शुगर ग्रीड लिमिटेड, मुक्काम पोस्ट – पिंगळी बुद्रुक, तालुका– माण, जिल्हा – सातारा, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन मळीवर आधारित १२०.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक, १७ मार्च, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई – २७ /२०२१ ,व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी–२१०३०९–एफटीएस-००९६, दिनांक ०९ मार्च, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः–

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) -सदस्य

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा - आयोजक

श्री एल. एस भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुनील थोरवे, अप्पर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री नीतीन रा. शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री एल. एस भड यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शुगर ग्रीड लिमिटेड, मुक्काम पोस्ट - पिंगळी बुद्रुक, तालुका-माण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांचा प्रस्तावित नविन मळीवर आधारित १२०.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (जी) मध्ये मोडत

असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळण, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, सातारा यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सातारा, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय – सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी – जिल्हा परिषद, सातारा, महाव्यवस्थापक-जिल्हा

उद्योग केंद्र,सातारा, तहसीलदार, तहसील कार्यालय- दहिवडी (माण), जिल्हा -सातारा, ग्रामपंचायत कार्यालय- मुक्काम पोस्ट - पिंगळी बुद्रुक, तालुका- माण, जिल्हा - सातारा, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सातारा यांना श्री एच. मधुबाबू, अध्यक्ष, रुरल एन्व्हॉयरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, मुशीराबाद, हैद्राबाद, यांच्याकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक श्री एल. एस. भड यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले:-

<u>खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-</u>

१) <u>श्री हनमंत अनंतराव इंदलकर, राहणार-उकीरडे, तालुका-माण, जिल्हा-सातारा:-</u>

उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणा-या सांडपाण्यावर काय प्रक्रिया करण्यात येणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की उत्पादन प्रक्रियेत दोन प्रकारचे सांडपाणी निर्माण होणार आहे. स्पेंट वॉश आणि स्पेंट लीज. स्पेंट वॉशची प्रदूषणाची तीव्रता ही जास्त असते. एक स्पेंट वॉशला आपण दोन भागात वेगळे करणार आहोत. एक भाग आपण मल्टी इफेक्टीव्ह इव्हॅपरेटरच्या सहायाने स्पेंट वॉश एकत्र (Concentrare) करणार आहोत. तो स्पेंट वॉश इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येणार आहे. दुसरा भागाचा स्पेंट वॉशची ड्रायरच्या मदतीने पावडर करणार आहोत. पावडरमध्ये पोटॅशचे प्रमाण जास्त असल्याने त्याचा खत म्हणून वापर करता येतो. अशा प्रकारे स्पेंट वॉश दोन भागात करण्यात येऊन त्यावर प्रक्रिया करण्यात येईल व शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) हे उद्दिष्ट साध्य करण्यात येईल.

स्पेंटलीझवर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा ज्यास सीपीयु (Condensate Polishing Unit) म्हणतात, ती उभारण्यात येणार आहे. यात प्राथमिक (Primary),दुय्यम (Secondary) आणि टर्शरी (Tertiary) स्तरावर प्रकिया करण्यात येईल. या प्रक्रिया केल्यामुळे प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता ही शुध्द पाण्यासारखी होईल व त्या पाण्याचा आपण उत्पादनप्रकियेत पुनर्वापर करणार आहोत. आसवणी प्रकल्पास बंधनकारक असणारे शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) हे उद्दिष्ट साध्य करण्यात येईल.

२)<u>श्री रविचंद्र गोविंदराव शिंदे, राहणार-दहिवडी, तालुका-माण, जिल्हा-सातारा:-</u>

मोलॅसिसवर आधारित आसवणी प्रकल्पात कोणत्या प्रकारचे सांडपाणी उत्पन्न होईल व त्याचे प्रमाण किती टक्के असेल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की मागच्या प्रश्नात सर्व माहिति सांगितलेली आहे. आसवणीत दोन प्रकारचे सांडपाणी निर्माण होते. त्यास स्पेंट वॉश आणि स्पेंट लिज असे म्हणतात. स्पेंट वॉशची प्रकिया आणि विल्हेवाट अशा

प्रकारे करण्यात येईल. एकूण ९६०.० घनमीटर प्रति दिन एवढा स्पेंट वॉश निर्माण होईल. म्हणजे एक लिटर अल्कोहोलला आठ लिटर स्पेंट वॉश तयार होईल. ९६०.० घनमीटर प्रति दिन उत्पन्न होणा-या स्पेंट वॉशमधील ३६०.० घनमीटर प्रति दिन स्पेंट वॉश हा मल्टी इफेक्टीव्ह इव्हॅपरेटरला जाईल. त्यातील ६०% इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येईल. तर ६००.० घनमीटर प्रति दिन स्पेंट वॉश हा बायो गॅस युनिटला जाईल. त्याची ड्रायरच्या सहाय्याने पावडर बनविण्यात येणार आहे.

त्यांनी पुढे सांगितले की स्पेंट लीझ सीपीयु युनिटमध्ये प्रक्रिया करुन त्या प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येईल.

३)<u>श्री धनाजी जालिंदर आवळे, राहणार-सुरखनवाडी, तालुका-माण, जिल्हा-सातारा:-</u>

प्रकिया केलेले सांडपाण्याचा पुनर्वापर कशा प्रकारे करता येऊ शकतो?

आसवणी प्रकल्पास बंधनकारक असलेला शून्य द्रव निस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) निर्देश तंतोतंत पाळण्यात येईल. प्रकल्पात उत्पन्न् होणारे स्पेंच लीज व इतर सांडपाण्यावर सीपीयुत (कन्डेन्सिंग पॉलिशिंग युनिट) प्रक्रिया करणार आहोत. त्या पाण्याचा प्रक्रियेत पुनर्वापर करता येणार आहे. ६९% पाणी आपण प्रक्रियेत पुनर्वापर करणार आहोत. त्यामुळे ताज्या पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल.

४) <u>श्री जीवन खंडू कांबळे, राहणार - पिंगळी बुद्रुक, तालुका-माण, जिल्हा-सातारा:-</u>

या आसवणी प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि उपलब्ध होईल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आसवणी प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि निश्चितच मिळणार आहे. प्रकल्पात ८५-९० प्रत्यक्ष व्यक्तींना रोजगाराची संधि

मिळू शकते. प्रकल्पाचा अप्रत्यक्ष फायदा हा खूपच मोठा आहे. परिसरातील व्यवसायात वाढ होईल, त्यामुळे अप्रत्यक्ष रोजगारात भरपूर वाढ होईल. उदा- मालवाहतुकीसाठी टॅकर्सची गरज पडेल, ते स्थानिकांकडून भाड्याने घेता येतील. स्थानिक वाहनचालकांना रोजगाराची संधि प्राप्त होतील. त्याचप्रमाणे चहाची टपरी, पानांची दुकाने, हॉटेल्स, वाहनांची देखभाल करण्यासाठी दुकाने याच्यात निश्चितच वाढ होईल. त्यामुळे त्यांनाही रोजगार मिळेल. परिसरातील व्यवसायात वाढ होईल.

आयोजक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे प्रकल्पाच्या पर्यावरणविषयचक सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

आयोजक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांची बैठकीच्या इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करुन मा. अध्यक्षांच्या मंजूरीने अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व प्राप्त लेखी सूचना यांसोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समितीत याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्व स्थानिक जनता, कारखाना प्रशासन, पत्रकार, पर्यावरणप्रेमी यांचे आभार मानले आणि अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेली एक सूचना सोबत जोडत आहोत.

( सुनील थोरवे )
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी – सातारा,
जिल्हा – सातारा

(एल.एस भड)
आयोजक,
पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
सातारा

(नीतीन रा. शिंदे)
सदस्य,
पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
पुणे

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शुगर ग्रीड लिमिटेड, मुक्काम पोस्ट – पिंगळी बुद्रुक, तालुका– माण, जिल्हा – सातारा, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन मळीवर आधारित १२०.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शुगर ग्रीड लिमिटेड, मुक्काम पोस्ट – पिंगळी बुद्रुक, तालुका– माण, जिल्हा – सातारा, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित नविन मळीवर आधारित १२०.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक, १७ मार्च, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई – २७ /२०२१ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी–२१०३०९–एफटीएस-००९६, दिनांक ०९ मार्च, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः–

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, -सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - आयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सातारा

श्री एल. एस भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति यांनी श्री सुनील थोरवे, अप्पर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति, श्री नीतीन रा. शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिति, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री एल. एस भड यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शुगर ग्रीड लिमिटेड, मुक्काम पोस्ट - पिंगळी बुद्रुक, तालुका-माण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांचा प्रस्तावित नविन मळीवर आधारित १२०.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (जी) मध्ये मोडत

असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०२० च्या कार्यालयीन टिप्पणीनुसार कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार उपस्थितांनी बैठकीत मुखपट्टी, दोन व्यक्तींमध्ये अंतर पाळण, सॅनिटायझरचा वापर बंधनकारक करण्यात आलेला आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, सातारा यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सातारा, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय – सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी – जिल्हा परिषद, सातारा, महाव्यवस्थापक-जिल्हा

उद्योग केंद्र,सातारा, तहसीलदार, तहसील कार्यालय- दहिवडी (माण), जिल्हा -सातारा, ग्रामपंचायत कार्यालय- मुक्काम पोस्ट - पिंगळी बुद्रुक, तालुका- माण, जिल्हा - सातारा, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सातारा यांना श्री एच. मधुबाबू, अध्यक्ष, रुरल एन्हॉयरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, मुशीराबाद, हैद्राबाद, यांच्याकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक श्री एल. एस. भड यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

<u>खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>

१)<u>श्री हनमंत अनंतराव इंदलकर, राहणार-उकीरडे, तालुका-माण, जिल्हा-साताराः-</u>

उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणा-या सांडपाण्यावर काय प्रक्रिया करण्यात येणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की उत्पादन प्रक्रियेत दोन प्रकारचे सांडपाणी निर्माण होणार आहे. स्पेंट वॉश आणि स्पेंट लीज. स्पेंट वॉशची प्रदूषणाची तीव्रता ही जास्त असते. स्पेंट वॉशला आपण दोन भागात वेगळे करणार आहोत. एक भाग आपण मल्टी इफेक्टीव्ह इव्हॅपरेटरच्या सहायाने स्पेंट वॉश एकत्र (Concentrare) करणार आहोत. तो स्पेंट वॉश इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येणार आहे. दुसरा भागाचा स्पेंट वॉशची ड्रायरच्या मदतीने पावडर करणार आहोत. पावडरमध्ये पोटॅशचे प्रमाण जास्त असल्याने त्याचा खत म्हणून वापर करता येतो. अशा प्रकारे स्पेंट वॉश दोन भागात करण्यात येऊन त्यावर प्रक्रिया करण्यात येईल व शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) हे उद्दिष्ट साध्य करण्यात येईल.

स्पेंटलीझवर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा ज्यास सीपीयु (Condensate Polishing Unit) म्हणतात, ती उभारण्यात येणार आहे. यात प्राथमिक (Primary),दुय्यम (Secondary) आणि टर्शरी (Tertiary) स्तरावर प्रकिया करण्यात येईल. या प्रक्रिया केल्यामुळे प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची गुणवत्ता ही शुध्द पाण्यासारखी होईल व त्या पाण्याचा आपण उत्पादनप्रकियेत पुनर्वापर करणार आहोत. आसवणी प्रकल्पास बंधनकारक असणारे शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) हे उद्दिष्ट साध्य करण्यात येईल.

२)<u>श्री रविचंद्र गोविंदराव शिंदे, राहणार-दहिवडी, तालुका-माण, जिल्हा-सातारा:-</u>

मोलॅसिसवर आधारित आसवणी प्रकल्पात कोणत्या प्रकारचे सांडपाणी उत्पन्न होईल व त्याचे प्रमाण किती टक्के असेल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की मागच्या प्रश्नात सर्व माहिती सांगितलेली आहे. आसवणीत दोन प्रकारचे सांडपाणी निर्माण होते. त्यास स्पेंट वॉश आणि स्पेंट लिज असे म्हणतात. स्पेंट वॉशची प्रकिया आणि विल्हेवाट अशा

प्रकारे करण्यात येईल. एकूण ९६०.० घनमीटर प्रति दिन एवढा स्पेंट वॉश निर्माण होईल. म्हणजे एक लिटर अल्कोहोलला आठ लिटर स्पेंट वॉश तयार होईल. ९६०.० घनमीटर प्रति दिन उत्पन्न होणा-या स्पेंट वॉशमधील ३६०.० घनमीटर प्रति दिन स्पेंट वॉश हा मल्टी इफेक्टीव्ह इव्हॅपरेटरला जाईल. त्यातील ६०% इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येईल. तर ६००.० घनमीटर प्रति दिन स्पेंट वॉश हा बायो गॅस युनिटला जाईल. त्याची ड्रायरच्या सहाय्याने पावडर बनविण्यात येणार आहे.

त्यांनी पुढे सांगितले की स्पेंट लीझ सीपीयु युनिटमध्ये प्रक्रिया करुन त्या प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येईल.

३)<u>श्री धनाजी जालिंदर आवळे, राहणार-सुरखनवाडी, तालुका-माण, जिल्हा-सातारा:-</u>

प्रकिया केलेले सांडपाण्याचा पुनर्वापर कशा प्रकारे करता येऊ शकतो?

आसवणी प्रकल्पास बंधनकारक असलेला शून्य द्रव निस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) निर्देश तंतोतंत पाळण्यात येईल. प्रकल्पात उत्पन्न् होणारे स्पेंच लीज व इतर सांडपाण्यावर सीपीयुत (कन्डेन्सिंग पॉलिशिंग युनिट) प्रक्रिया करणार आहोत. त्या पाण्याचा प्रक्रियेत पुनर्वापर करता येणार आहे. ६९% पाणी आपण प्रक्रियेत पुनर्वापर करणार आहोत. त्यामुळे ताज्या पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होईल.

४) <u>श्री जीवन खंडू कांबळे, राहणार - पिंगळी बुद्रुक, तालुका-माण, जिल्हा-सातारा:-</u>

या आसवणी प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि उपलब्ध होईल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आसवणी प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि निश्चितच मिळणार आहे. प्रकल्पात ८५-९० प्रत्यक्ष व्यक्तींना रोजगाराची संधि

मिळू शकते. प्रकल्पाचा अप्रत्यक्ष फायदा हा खूपच मोठा आहे. परिसरातील व्यवसायात वाढ होईल, त्यामुळे अप्रत्यक्ष रोजगारात भरपूर वाढ होईल. उदा- मालवाहतुकीसाठी टॅकर्सची गरज पडेल, ते स्थानिकांकडून भाड्याने घेता येतील. स्थानिक वाहनचालकांना रोजगाराची संधि प्राप्त होतील. त्याचप्रमाणे चहाची टपरी, पानांची दुकाने, हॉटेल्स, वाहनांची देखभाल करण्यासाठी दुकाने याच्यात निश्चितच वाढ होईल. त्यामुळे त्यांनाही रोजगार मिळेल. परिसरातील व्यवसायात वाढ होईल.

आयोजक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे प्रकल्पाच्या पर्यावरणविषयचक सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

आयोजक , पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, हरकती, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांची बैठकीच्या इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करुन मा. अध्यक्षांच्या मंजूरीने अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व प्राप्त लेखी सूचना यांसोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समितीत याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्व स्थानिक जनता, कारखाना प्रशासन, पत्रकार, पर्यावरणप्रेमी यांचे आभार मानले आणि अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेली एक सूचना सोबत जोडत आहोत.

( सुनील थोरवे )
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिति
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी – सातारा,
जिल्हा – सातारा

(एल.एस भड)
आयोजक,
पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिति
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
सातारा

(नीतीन रा. शिंदे)
सदस्य,
पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिति
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
पुणे